# महिलांसाठी कॅन्सर तपासणी; मॅमोग्राफी, कॉल्पोस्कोप चाचणी

## मुकुल माधव फाउंडेशन, फिनोलेक्स इंडस्ट्रीज लि.चा उपक्रम

**रत्नागिरी / वार्ताहर :**

मुकुल माधव फाऊंडेशन आणि फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेड यांच्या वतीने महिला दिनाच्या निमित्ताने रत्नागिरीतील महिलांना विशेष भेट मिळाली असून, त्यांच्यासाठी अतिशय सवलतीच्या दरात मॅमोग्राफी चाचणी उपलब्ध करून देण्यात आली आहे. या चाचणीमुळे कॅन्सरसारख्या भयंकर रोगाचे सुरुवातीच्या टप्प्यात व वेळेत निदान होण्यास मदत होणार आहे.

रत्नागिरी जि.प.च्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रेरणा देशभ्रतार यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी जयश्री गायकवाड, एमआयडीसीच्या अभियंता नागवेकर, फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे संचालक संजय मठ, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अनिरुद्ध आठल्ये हेही उपस्थित होते. फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेड यांच्या वतीने कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सबिलिटी(सीएसआर) उपक्रमांतर्गत काम पाहणाऱ्या मुकुल माधव फाउंडेशनच्या पुढाकाराने रत्नागिरी येथे महिलांसाठी १३ दिवसांचे आरोग्य तपासणी शिबिर सुरू आहे. शिबिराची सुरुवात ७ मार्च रोजी झाली असून १९ मार्चपर्यंत ते सुरू राहणार आहे. हे शिबिर रत्नागिरीतील परकार रुग्णालयात (मारुती मंदिराजवळ) सुरू आहे. या शिबिरात सवलतीच्या दरात मॅमोग्राफी आणि कॉल्पोस्कोप चाचणी करून देण्यात येणार आहे. मॅमोग्राफी ही विशेष वैद्यकीय पद्धती आहे. त्यात कमी तीव्रतेचे एक्स-रे वापरले जातात. त्यामुळे महिलांमधील स्तनाचा कर्करोगासारख्या आजारांचे लवकर निदान होते. त्यामुळे तो आजार टाळणे व यशस्वीपणे बरा करण्यास मदत होते. मॅमोग्राफी आणि कॉल्पोस्कोप या शिबिरात ती प्रत्येक केवळ २०० रुपयांना करून दिली जाणार आहे. या शिबिरापैकी उर्वरित खर्च उचलण्याची जबाबदारी फिनोलेक्स पाईप्सने घेतली आहे.

एमएमएफ आणि फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेड यांनी आधीसुद्धा अशा प्रकारची आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित केली आहेत. त्यापैकी गेल्या मार्च महिन्यातील शिबिराचा २०० महिलांनी, तर सप्टेंबर महिन्यातील शिबिराचा ५०० महिलांनी लाभ घेतला होता. फिनोलेक्स वुमन्स वेल-बीईंग क्लनिक रत्नागिरी येथे २०१४ साली सुरूवात करण्यात आले. हा मुकुल माधव फाउंडेशनचा उपक्रम आहे. त्याला फिनोलेक्स पाईप्सतर्फे मॅमोग्राफी चाचणी करण्यासाठीचे मशीन तसेच कॉल्पोस्कोप हे दान करण्यात आले आहे. कॉल्पोस्कोपीद्वारे सर्व्हकल कॅन्सरची योग्य प्रकारे तपासणी करण्यात येते. रत्नागिरी जिल्ह्याच्या ग्रामीण भागात आणि शहरातही इतरत्र कुठेही अशा प्रकारची अद्ययावत यंत्रणा उपलब्ध नाही.

जिल्ह्यातील महिलांमध्ये स्तनाचा कॅन्सर आणि सर्व्हक्स(गर्भाशय मुख) कॅन्सर याबाबत जनजागृती निर्माण करणे हा या शिबिरामागचा प्रमुख हेतू आहे. त्यामुळे सुरुवातीच्या टप्प्यातच रोगाचे निदान होईल आणि त्यांना तो बरा करणे शक्य होईल. ही बाब महिलांच्या आरोग्याबरोबरच संपूर्ण कुटुंबाच्या दृष्टीने कल्याणाची आहे, असे फिनोलेक्सचे समन्वयक डॉ. आशुतोष मुळ्ये यांनी सांगितले. या शिबिरात मॅमोग्राफी चाचणीसाठी लागणारी रेडिओग्राफी डायग्नोस्टिक सेवा ऑन्को-सर्जिकल सेवा पुण्यातील प्रशांती कॅन्सर केअर मिशनचे डॉ. सी. पी. कोप्पीकर यांनी उपलब्ध करून दिली आहे.